0001

## नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई यांचे समोर

वाचा :- १) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचा दि. २५/०६/२०११ रोजीचा अहवाल व त्यासोबत प्राप्त झालेली कागदपत्रे.

२) या कार्यालयाची "कारणे दाखवा नोटीस" क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४८/२०११/जा.५१३, दिनांक २९/०६/२०११, ०८/०७/२०११ व २९/०७/२०११.

३) वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन यांचे दि.१६/०७/२०११ रोजीचे अभिवेदन.

४) अकबर लतीफ पिंजारा, निजामउद्दीन मुसा कारा, अब्दुल कादर मुसा कारा, "अल वसिला" या बोटीचा मालक इम्तियाज नुरुल्ला खान व मोहम्मद सोहेल सिंकदर खान यांचे दि. १६/०७/२०११ रोजीची स्वतंत्र लेखी निवेदने.

५) नुर मोहम्मद उर्फ छोटा नुरा बच्चु कुरेशी, मोहम्मद सत्तार अली अब्दुल अजीज अली व अजीज मुसा अब्दुल्ला कारा यांचे दिनांक २७/०७/२०११ रोजीची स्वतंत्र लेखी निवेदने.

६) मोहम्मद याकूब मोहम्मद अयूब व बडा नुरा उर्फ नुरुल्ला खान रसुल खान यांचे दि.०९/०८/२०११ रोजीचे स्वतंत्र लेखी निवेदने.

CONTROLLER OF RATIONING & DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
HEAD OFFICE
MUMBAI

क्र.निशि/अंमल/६-अ/प्र.क्र.४८/२०११/जा ६७०
नियंत्रक शिधावाटप व संचालक
नागरी पुरवठा यांचे कार्यालय,
रॉयल इन्शुरन्स इमारत, ५ वा मजला,
१४, ज.टाटा मार्ग, चर्चगेट,
मुंबई - ४०० ०२०.
दिनांक : १८/०८/२०११.

## आदेश.

(जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ अन्वये)

### प्रकरणाची पार्श्वभूमी :-

"अल वसिला" या बोटीमध्ये समुद्रामार्गे मोठ्या प्रमाणात डिझेल व पेट्रोलजन्य पदार्थाची तस्करी होत असून तस्करी करुन आलेला पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा दमानिया जे.टी. धक्क्यावर उतरविण्यात येणार असून तेथे सदरचा माल बोटीमधून मो/टँकर मध्ये भरुन तो चढया भावाने विक्रीसाठी मुंबई परिसरात जाणार आहे, अशी माहिती सागरी पोलिस ठाणे, मुंबई यांना दिनांक १४/०५/२०११ रोजी मिळाल्यावरुन बंदर परिमंडळ, मुंबई तसेच यलोगेट विभाग, मुंबई यांची पथके सरकारी वाहनाने दमानिया जे.टी. येथे दि.१४/०५/२०११ रोजी २३:४५ वाजता

रवाना झाले व सदर ठिकाणी अधिकाऱ्यांनी दोन पंचाना बोलावून पथकासह दमानिया जेटी धक्क्यावरुन समुद्रामध्ये गस्तीसाठी रवाना झाले.

दिनांक १५/०५/२०११ रोजी अंदाजे पहाटे ०५:०० वाजणेचे दरम्यान नमूद पथके पोलिस नौकेसह गस्त करीत असताना एक संशयास्पद बोट समुद्रात दिसून आली. सदर बोटीस बॅटरीच्या मदतीने लाईट मारुन थांबण्याचा इशारा दिला असता सदर बोट चालकाने त्यांची बोट न थांबविता बोटीचा वेग वाढवून पळून जाण्याचा प्रयत्न करु लागला. अधिकाऱ्यांनी पोलिस नौकेने सदर बोटीचा पाठलाग करुन बोट थांबविली. सदरची बोट जवळ घेऊन अधिकाऱ्यांनी पोलिस नौकेतून सदरच्या बोटीत उड्या मारुन प्रवेश केला असता, सदर बोटीवर सहा इसम हजर होते. अधिकाऱ्यांनी सदर इसमांना त्यांची नावे विचारली असता, त्यांनी त्यांची नावे १) नुर मोहम्मद उर्फ छोटा नुरा बच्चु कुरेशी २) मोहम्मद सत्तार अली अब्दुल अजीज अली ३) नियाज अहमद सिराज अहमद शेख ४) जागेश्वर अमृत महातो ५) अजीज मुसा अब्दुल्ला तारा व ६) नंदलाल उर्फ नंदु तेजो महातो अशी सांगितली.

नमूद इसमांना बोट कोणाच्या मालकीची असून ती कोणाच्या नावावर आहे व त्यांची नोंदणी काय म्हणून झालेली आहे. याबाबत नुर मोहम्मद उर्फ छोटा नुरा बच्चु कुरेशी या इसमास विचारपूस केली असता त्याने सांगितले की, सदर बोट ही त्याने त्याचा मित्र इम्मु खान (पूर्ण नाव व पत्ता माहित नाही) याचेकडून भाड्याने घेतलेली आहे. सदर व्यवसायात त्याचे बरोबर बडा नुरा, अकबर व सोहेल हे भागीदार असल्याचेही त्याने सांगितले. सदर बोटीची मोराबंदर येथे "अल वसिला" या नावाने नोंदणी झाली असून सदर बोटीचा उपयोग टोविंग कण्यासाठी केला जातो. सदर बोटीबाबत त्याचेकडे कागदपत्राची मागणी केली असता, त्याने बोटीचे कागदपत्रे मालकाकडे असल्याचे सांगितले. त्याच्या संमतीने बोटीची तपासणी केली असता बोटीमध्ये विविध क्षमतेचे पेट्रोलजन्य पदार्थ साठविण्यासाठी अकरा कप्पे दिसून आले. सदर पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा कोणत्या जहाजातून आणला याबाबत त्यांना विचारपुस केली असता, त्यांनी समाधानकारक माहिती दिली नाही. नमूद इसमांनी बोटीमध्ये विनापरवाना पेट्रोलजन्य पदार्थाचा साठा बाळगल्याने व मिळालेल्या बातमीची खात्री झाल्याने सदरची बोट दमानिया जे.टी. या धक्क्यावर खेचून आणण्यात आली.

अशाप्रकारे उपरोक्त सर्व संबंधितांनी संगणमत करुन त्यांच्या ताब्यात मिळालेल्या "अल वसिला" या बोटीची नोंदणी टोविंगसाठी असताना, सदर बोटीमध्ये विना परवाना कप्पे तयार करुन त्यामध्ये डिझेल या पेट्रोलजन्य पदार्थाची बेकायदेशिररित्या समुद्रामार्गे तस्करी करुन सदर पेट्रोलजन्य पदार्थ हा ज्वलनशिल असल्याचे माहित असून सुध्दा स्वत: जवळ विनापरवाना बाळगला व ज्वालाग्राही पदार्थामुळे मानवी जिवीतास पोहचणाऱ्या कोणत्याही संभाव्य धोक्यापासून सुरक्षित राहाण्यास पुरेसा इतका बंदोबस्त करण्याची जाणीव पूर्वक हयगय केल्याने, पर्यायाने त्यांनी शासनाची तसेच उपभोक्त्यांची फसवणूक केल्याचे सिध्द होत असल्याने संबंधितांविरुध्द (१) मेसर्स

CONTROLLER OF RATIONING & ... HEAD O... MUMB...

0003

वि. चे कलम २८४, २८५, ३४ (२) दि मोटार स्पिरीट ॲण्ड हायस्पीड डिझेल (रेग्युलेशन ऑफ सप्लाय, डिस्ट्रीब्युशन ॲण्ड प्रीव्हेंशन ऑफ मालप्रॅक्टीसेस) ऑर्डर २००५ चे कलम ३ (३) दि प्रिव्हेन्शन ऑफ ब्लॅक मार्केटिग ॲण्ड मेन्टेनन्स ऑफ सप्लार्य ऑफ इशनशिल कमोडीटीज ॲक्ट १९८० चे कलम ३ (४) दि पेट्रोलियम प्रॉडेक्ट (मेन्टेन ऑफ प्रॉडक्शन स्टोरेज ॲन्ड सप्लायर्स) ऑर्डर १९९९ चे कलम ३, ४, ५, ६, ७ तसेच (५) जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ३, ७(२) चा भंग केल्यावरुन त्यांचेविरुध्द यलोगेट पोलिस ठाणे, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. ०९/२०११, दि.१५/०५/२०११ अन्वये गुन्हा नोंद करुन खालील मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच जप्त साठयातून पंचासमक्ष नमुने घेण्यात आले. जप्त केलेला माल व बोट हे वाहतूकीस अवजड असल्याने सदरची बोट पेट्रोलजन्य पदार्थाच्या मालासह दमानिया जे.टी. या धक्क्यावर दोरीच्या सहाय्याने बांधून सुरक्षित पोलिस पहाऱ्यात ठेवण्यात आली आहे.

| अ. क्र. | जप्त मुद्देमाल तपशिल | नग / साठा | जप्त मुद्देमालाची एकूण किंमत (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | "अल वसिला" या नावाची बोट | १ नग | ७५,००,०००/- |
| २ | उक्त बोटीमधील डिझेल | ५०००० लिटर | २५,००,०००/- |
| ३ | होंडा कंपनीचे ३ डिझेल पंप व प्लॉस्टिक पाईप इ. | - | १५,७००/- |
| | | एकूण | १,००,१५,७००/- |

उपरोक्त जप्त मुद्देमालाची जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-अ प्रमाणे विल्हेवाट लावण्याची विनंती वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांनी वाचावे क्र.१ मध्ये नमूद अहवालान्वये केली असून त्यानुषंगाने जीवनावश्यक वस्तू कायदा, १९५५ चे कलम ६-ब नुसार सर्व संबंधितांना वरील वाचावे क्र. २ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कारणे दाखवा नोटीस बजावून या प्रकरणी जप्त करण्यात आलेला मुद्देमाल सरकारजमा का करण्यात येऊ नये, याची कारणे स्पष्ट करणारा खुलासा मागविण्यात आला. तसेच मौखिक खुलासा करण्याची संधी म्हणून दिनांक ०७/०७/२०११ रोजी या कार्यालयात सुनावणी ठेवण्यात आली.

दिनांक ०७/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस अकबर लतीफ पिंजारा उपस्थित राहिले व त्यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळावी म्हणून लेखी विनंती केली. तथापी, सदर सुनावणीस तपासी पोलीस अधिकारी तसेच इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहीले नाहीत. सबब, सदरची सुनावणी स्थगीत करुन पुढील सुनावणी दिनांक १६/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक १६/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस यलोगेट पोलिस स्टेशनचे पोलिस उप निरिक्षक श्री. मोहन डी. जाधव उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ३ अन्वये लेखी अभिवेदन सादर केले. तसेच सदर सुनावणीस अकबर लतीफ पिंजारा, निजामउद्दीन मुसा कारा, अब्दुल कादर मुसा कारा, "अल वसिला" या बोटीचा मालक

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES ... FICE

इम्तियाज नुरुल्ला खान व मोहम्मद सोहेल सिंकदर खान हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ४ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तथापी, सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, त्यांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी एक संधी म्हणून पुढील सुनावणी दि. २७/०७/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक २७/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस नुर मोहम्मद उर्फ छोटा नुरा बच्चु कुरेशी, मोहम्मद सत्तार अली अब्दुल अजीज अली व अजीज मुसा अब्दुल्ला कारा हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ५ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तथापी, सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. सबब, त्यांना त्यांचे म्हणणे सादर करण्यासाठी अंतिम संधी म्हणून पुढील सुनावणी दि. ०९/८/२०११ रोजी ठेवण्यात आली.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस मोहम्मद याकूब मोहम्मद अयूब व बडा नुरा उर्फ नुरुल्ला खान रसुल खान हे उपस्थित राहिले व त्यांनी त्यांचे वाचावे क्र. ६ अन्वये स्वतंत्र लेखी निवेदने सादर केली. तथापी, सदर सुनावणीस इतर आरोपी/अपचारी उपस्थित राहिले नाहीत. दरम्यान पोलीस अधिकारी यांनी सादर केलेल्या अभिवेदनात, यातील तीन आरोपीत त्यांचे मुळगावी झारखंड येथे गेले असून, इतर आरोपीत मिळुन आले नाहीत. तसेच जप्त टग (बोट) जेटीला बांधून ठेवले असून, समुद्रातील प्रचंड लाटामुळे टग अपघातग्रस्त होवून त्यातील जप्त डिझेल समुद्रात पसरण्याची दाट शक्यता आहे, असे नमुद केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त द्रवपदार्थ ज्वलनशील असून, त्याची त्वरीत विल्हेवाट लावणे अगत्याचे आहे. सबब, प्रकरण गुणवत्तेच्या आधारे निर्णयास्तव राखीव ठेवण्यात आले.

## युक्तिवाद :-

दिनांक १६/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित यलोगेट पोलिस स्टेशनचे पोलिस उप निरिक्षक यांनी सादर केलेल्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे अभिवेदनात, सदर गुन्ह्यातील तीन आरोपीत त्यांचे मुळगावी झारखंड राज्यात गेले असून, त्यांचेपैकी नंदलाल उर्फ नंदू तेजो महातो हा एड्स या आजारामुळे झारखंड येथील रुग्णालयात दाखल आहे. तसेच इतर चार आरोपीत अद्यापही मिळुन आले नाहीत, असे नमूद केले आहे.

दिनांक १६/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मोहम्मद सोहेल सिंकदर खान यांनी युक्तिवाद केला की, "अल वसिला" बोटीमधील डिझेल किंवा पेट्रोलियम पदार्थाबाबत त्याला काहीही माहिती नाही. तसेच या गुन्ह्यात त्याचे नाव का घालण्यात आले, याबाबतही त्याला माहित नाही. तसेच त्याला काहीही सांगावयाचे नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १६/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अकबर लतीफ पिंजारा यांनी युक्तिवाद केला की, "अल वसिला" बोटीमधील डिझेल किंवा पेट्रोलियम पदार्थाबाबत त्याला काहीही माहिती नाही. तसेच तो घटनेच्या

CONTROLLER OF RATIONING HEAD O... MUM...

दिवशी मुंबईबाहेर असतानांही सदर गुन्ह्यात त्याचे नाव टाकण्यात आले. छोटा नुराने त्याचे नाव सदर गुन्ह्यात का घेतले, याबाबतही त्याला माहित नाही. तसेच त्याला काहीही सांगावयाचे नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १६/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित "अल वसिला" या बोटीचा मालक इम्तियाज नुरुल्ला खान यांनी युक्तिवाद केला की, तो "अल वसिला" या टगचा मालक असून बांद्रा ग्रुप ऑफ पोर्ट, मुंबई येथे त्याचे नावे सदर टगची नोंदनी झालेली आहे. या टगचा वापर तो मोठ्या बार्ज आणि छोट्या टगच्या टोविंगसाठी करतो. परंतू त्याचे कोटुबिंक व इतर समस्येमुळे तो व्यवसाय सांभाळू शकत नाही. तसेच सदर टगचा मेंटनेसची व्यवस्था करु शकत नाही. यामुळे त्याने सदर टग जानेवारी, २०११ पासून नुर मोहम्मद बच्चू कुरेशी याला फक्त व्यावसायाकरिता भाडेतत्त्वावर दिली असून तसा दिनांक १ जानेवारी, २०११ रोजी भाडेकरारनामा केलेला आहे. टगमध्ये डिझेल कोठून, कधी व केव्हा साठवणूक केले हे त्याला माहित नाही. या टगवरच त्याच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह अवलंबून असून, जप्त केलेली टग त्याला परत मिळावी. तसेच त्याच्या टगमधील डिझेल जप्त करण्यास त्याची काहीही हरकत नसल्याचे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक १६/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित निजामउद्दीन मुसा कारा व अब्दुल कादर मुसा कारा, यांनी युक्तिवाद केला की, जप्त केलेल्या डिझेल/पेट्रोल बाबत त्यांना काहीही सांगावयाचे नाही. तसेच जप्त बोट तिच्या वैध मालकास देण्यात यावी, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित अजीज मुसा अब्दुल्ला कारा व मोहम्मद सत्तार अली अब्दुल अजीज अली यांनी युक्तिवाद केला की, ते अल वसिला बोटीत खलाशी असून टोविंगचे काम करतात. त्यांचे मालक नंदलाल असून नंदलाल हे सदर बोटीवर चालकाचे काम करतात. त्यावेळेस नंदलाल काय करीत आहेत हे त्यांना माहिती नव्हते. त्यांनी नंदलाल यास काय करीत आहेत, असे विचारले असता त्याने ते सर्व्हिस टँकसाठी डिझेल घेत असल्याचे सांगितले व तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक २७/०७/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित नुर मोहम्मद बच्चु कुरेशी उर्फ छोटा नुरा यांनी युक्तिवाद केला की, सदर गुन्ह्यात जप्त केलेली अल वसीला बोट ही इम्तीयाज नुरुल्ला खान यांचे नावाने असून, ही बोट त्याने दिनांक ०१/०१/२०११ पासून एक वर्षाच्या कालावधीकरीता भाड्याने चालविण्याकरीता घेतलेली आहे व तसा भाडे करारनामा केला आहे. अल वसिला या बोटीने तो टोवींगचे काम करतो. टोवींगचे काम २४ तास चालत असून बोट बंद पडू नये म्हणून तो जास्त डिझेलची साठवणूक करीत असतो. बोटीवर टोवींगचे काम खलाशी करीत असतात. टोवींगचे काम करण्यासाठी तो स्वत: बोटीवर जात नाही. बोटीवर नंदलाल नावाचे चालक असून, बोटीकरीता लागणारे डिझेल नंदलालच खरेदी करतो. त्यामुळे या घटनेत पकडण्यात आलेले डिझेल नंदलाल याने

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
...FICE

कोठून आणले हे त्याला माहित नाही. या बोटीच्या व्यवसायावरच त्याच्या व खलाशीच्या कुटूंबाचे जीवनमान अवलंबून असून, बोट जप्त केली असल्याने उपासमारीची वेळ आली आहे. तरी जप्त केलेली अल वसिला बोट त्याला परत मिळावी, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित बडा नुरा उर्फ नुरुल्ला खान रसुल खान यांनी युक्तिवाद केला की, तो घटनेच्यावेळी मुंबई येथे नसल्याने त्याचा या गुन्ह्याशी संबंध नाही. तसेच अल वसिला बोट मालकास परत करण्यास त्याची काही हरकत नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

दिनांक ०९/०८/२०११ रोजीच्या सुनावणीस उपस्थित मोहम्मद याकूब मोहम्मद अयुब यांनी युक्तिवाद केला की, अल वसिला बोट परत करण्यास त्याची काही हरकत नाही. तसेच जप्त केलेल्या डिझेलबाबत त्याला काहीही माहित नाही, असे सांगून तसे लेखी निवेदन सादर केले.

प्रस्तुत प्रकरणी इतर आरोपी/अपचारी यांना पुरेसी संधी देवून देखील सुनावणीस उपस्थित राहीले नाहीत.

## निष्कर्ष :-

प्रस्तुत प्रकरणातील आरोपी/अपचारी यांचे निवेदन, तपासी पोलीस अधिकारी यांचे अभिवेदन व अभिलेखावरील उपलब्ध पुरावादर्शक कागदपत्रे विचारात घेऊन मी खालील प्रमाणे निष्कर्ष काढीत आहे.

प्रस्तुत प्रकरणी दि. १४/०५/२०११ रोजी सागरी पोलिस ठाणे, मुंबई यांना मिळालेल्या बातमीनुसार तेथील तसेच यलोगेट पोलीस ठाणेतील पोलीस अधिकारी हे दमानिया जेटी धक्क्यावरुन समुद्रामार्गे गस्त घालत असतांना दिनांक १५/०५/२०११ रोजी अंदाजे पहाटे ०५:०० वाजणेचे सुमारास एक संशयास्पद बोट समुद्रात दिसून आल्याने बॅटरीच्या मदतीने लाईट मारुन थांबण्याचा इशारा दिला असता सदर बोट चालकाने त्यांची बोट न थांबविता बोटीचा वेग वाढवून पळून जाण्याचा प्रयत्न करु लागला. अधिकाऱ्यांनी पोलिस नौकेने सदर बोटीचा पाठलाग करुन बोट थांबविली व सदर बोटीत प्रवेश केला. त्यावेळी बोटीवर सहा इसम उपस्थित होते. सदर बोटीस पेट्रोलजन्य द्रवपदार्थाचा साठा करण्यासाठी अकरा कप्पे असून, त्याची पहाणी केली असता, त्यामध्ये डिझेल असल्याचे आढळून आले. याबाबत उपस्थित इसमास विचारणा केली असता, त्यानी कोणतीही समाधानकारक उत्तरे दिली नाही. तसेच डिझेलबाबत कोणतीही कागदपत्रे सादर केली नाहीत. यावरुन सदर अलवसिला बोट व त्यामधील ५०००० लिटर डिझेलचा साठा जप्त करण्यात आला.

CONTROLLER RATIONING HEAD MU

सुनावणीचे वेळी आरोपी मोहम्मद सोहेल सिंकदर खान, अकबर लतीफ पिंजारा निजामउद्दीन मुसा कारा, अब्दुल कादर मुसा कारा, बडा नुरा उर्फ नुरुल्ला खान रसुल खान व मोहम्मद याकूब मोहम्मद अयुब यांनी दिलेल्या खुलाशात, सदर जप्त डिझेलबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे व या गुन्ह्याशी संबंध नसल्याचे नमुद केले आहे. तसेच नुर मोहम्मद बच्चु कुरेशी उर्फ छोटा नुरा यांनी सुनावणीचेवेळी खुलासा केला की, जप्त केलेली अल वसीला बोट ही एक वर्षाच्या कालावधीकरीता भाड्याने चालविण्याकरीता घेतलेली असून, या बोटीने ते टोवींगचे काम करतात. टोवींगचे काम २४ तास चालत असल्याने ते बोटीमध्ये जास्त डिझेलची साठवणूक करतात. बोटीकरीता लागणारे डिझेल हे बोटीचे चालक नंदलाल खरेदी करतात. त्यामुळे या घटनेत पकडण्यात आलेले डिझेल नंदलाल याने कोठून आणले हे त्याला माहित नाही. तथापी, सदर गुन्ह्यातील तीन आरोपीत त्यांचे मुळगावी झारखंड राज्यात गेले असून, त्यांचेपैकी नंदलाल उर्फ नंदू तेजो महातो हा एड्स या आजारामुळे झारखंड येथील रुग्णालयात दाखल आहे. तसेच इतर चार आरोपीत अद्यापही मिळुन आले नसल्याचा खुलासा पोलीसांनी सुनावणीचेवेळी केला आहे.

त्याचप्रमाणे सदरची बोट ही टोवींगसाठी असतांनाही बोटीमध्ये डिझेल साठविण्याकरीता विना परवाना कप्पे तयार करुन सदर पेट्रोलजन्य द्रवपदार्थ समुद्रामार्गे तस्करी करुन विनापरवाना जवळ बाळगला असल्याचे पोलीसांचे अहवालात नमुद केले आहे. तसेच सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेल्या डिझेलबाबत कोणताही कायदेशीर पुरावा अथवा कागदपत्रे आरोपी यांनी सुनावणीचेवेळी सादर केलेला नाही. सद्य:स्थितीत सकृतदर्शनी दिसून येत असलेल्या वस्तूस्थितीवरुन सदरचा जप्त केलेला डिझेलचा साठा हा गैरमार्गाने व बेकायदेशीरित्या मिळविला असल्याचे दिसून येत असून सदर डिझेल साठा हा अवैध ठरतो. प्रस्तुत प्रकरणी गुन्हा दाखल असून मा.न्यायालयात याबाबत सत्यसत्यता तपासली जाईलच. सबब, जप्त करण्यात आलेला डिझेलचा संपूर्ण साठा शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेली "अल वसिंला" बोट ही इम्तियाज नुरुल्ला खान यांचे मालकीची असल्याचे इम्तियाज नुरुल्ला खान यांनी सादर केलेल्या बांद्रा ग्रूप ऑफ पोर्ट, मुंबई यांचे नोंदणी प्रमाणपत्र क्र. बीडीआर/IV/०१३४३ वरुन दिसून येते. तसेच त्यांनी दिलेल्या निवेदनात, सदरची "अल वसिला" बोट ही जानेवारी, २०११ पासून नुर मोहम्मद बच्चू कुरेशी याला फक्त व्यावसायाकरिता भाडेतत्त्वावर दिली असून तसा दि. १ जानेवारी, २०११ रोजी भाडेकरारनामा केलेला असल्याचे तसेच बोटीमध्ये डिझेल कोठून, कधी व केव्हा साठवणूक केले हे त्याला माहित नसून, बोटीमधील डिझेल जप्त करुन सदर बोट त्याला परत मिळावी, असे नमुद केले आहे. बोट मालकाने दिलेल्या निवेदनावरुन, जरी बोट मालकास सदर घटनेची माहीती नसली व सदरची बोट त्याने

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES OFFICE ... BAI

भाड्याने दिली असली तरी, आरोपी यांनी विनापरवाना व बेकायदेशीररित्या मिळविलेल्या जप्त डिझेलची वाहतूक व साठवणूक करण्याकरीता सदर बोटीचा गैरवापर केला असल्याचे सकृतदर्शनी दिसून येते. प्रकरणी, सदर बोट मालकाच्या अपरोक्ष जरी गुन्हा घडला असला तरी, बोट मालक या नात्याने त्यांनी त्यांच्या बोटीचा गैरवापर होणार नाही याची सर्वेतोपरी दक्षता घेणे आवश्यक आहे. सबब, जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६ (अ) (क) मधील तरतुदीनुसार सदरची जप्त करण्यात आलेली अल वसिला बोट ही तीच्या किंमतीएवढी रक्कम भरण्यास बोटीचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची बोट मालकास परत करण्याच्या अथवा बोट मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या बोटीची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करण्याच्या निष्कर्षाप्रत मी आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणी जप्त मुद्देमालाची विल्हेवाट लावण्याचे आदेश देण्यापुरतेच सदरचे प्रकरण या कार्यालयाशी सीमित असून फौजदारी गुन्हा नोंद प्रकरणी संबंधित न्यायालयात योग्य तो निर्णय होईलच. सबब, उपरोक्त विवेचन विचारात घेऊन मी, नियंत्रक शिधावाटप व संचालक नागरी पुरवठा, मुंबई, मला जीवनावश्यक वस्तु कायदा १९५५ चे कलम ६-अ नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई येथे गुन्हा नोंद क्र. १९/२०११, दि.१५/०५/२०११ मध्ये जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालासंदर्भात न्यायालयीन निर्णयाच्या अधीन राहून खालील आदेश देत आहे.

आदेश :-

१) जप्त करण्यात आलेली "अल वसिला" बोट ही शासनजमा करण्यात येत आहे. सदर बोटीच्या बाजारमुल्या एवढी रक्कम भरण्यास बोटीचे मालक तयार असल्यास, तेवढी रक्कम भरल्यानंतर सदरची बोट त्याच्या मालकास परत करण्यात यावी व सदर रक्कम शासनजमा करावी. अथवा बोट मालक सदरची रक्कम भरण्यास तयार नसल्यास या बोटीची जाहीर लिलावाने विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

२) तथापी, सदरची बोट लिलाव करण्यापूर्वी या कार्यालयास तसे लेखी सुचीत करावे.

३) प्रस्तूत प्रकरणी जप्त करण्यात आलेला संपूर्ण ५०००० लिटर डिझेलचा साठा पोलीसांनी सद्याच्या प्रचलित दरानुसार वैध परवानाधारकांस विक्री करुन येणारी रक्कम शासनजमा करावी.

CONTROLLER OF RATIONING HEA

वरीलप्रमाणे जप्त मुद्देमालाची पोलिसांनी विल्हेवाट लावून येणारी रक्कम पोलीसांनी वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई यांचे कार्यालयाच्या वैयक्तिक ठेव लेख्यात ४४०८ या लेखाशिर्षात जमा करावी.

सही -
नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.

प्रति,

१) नुर मोहम्मद उर्फ छोटा नुरा बच्चु कुरेशी
२) मोहम्मद सत्तार अली अब्दुल अजीज अली
३) नियाज अहमद सिराज अहमद शेख
४) जागेश्वर अमृत महातो
५) अजीज मुसा अब्दुल्ला कारा
६) नंदलाल उर्फ नंदु तेजो महातो
७) "अल वसिला" या बोटीचा मालक
८) अब्दुल कादर मुसा कारा
९) अकबर लतीफ पिंजारा
१०) मोहम्मद सोहेल सिकंदर खान
११) निजामउद्दीन मुसा कारा
१२) बडा नुरा
१३) जलील उर्फ भाईजान
१४) मोहम्मद याकूब मोहम्मद अयूब
१५) अशोक (सागर सेवक बोटीचा चीफ ऑफिसर)
(वरिष्ठ पोलीस निरीक्षक, यलोगेट पोलिस स्टेशन, मुंबई यांचे मार्फत)

प्रत,

१) वरिष्ठ पोलिस निरिक्षक, यलोगेट पोलीस ठाणे, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदरचे आदेश संबंधीतांवर बजावून त्याची दिनांकित पोच या कार्यालयास तात्काळ सादर करावी. तसेच आदेशाची अंमलबजावणी करुन पूर्तता अहवाल विनाविलंब या कार्यालयास सादर करावा.

२) वित्तीय सल्लागार व उपसचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, बंगाली गर्ल्स हायस्कूल, चर्चगेट, मुंबई यांना माहितीसाठी अग्रेषित.

३) निवड नस्ती.

DIRECTOR OF CIVIL SUPPLIES
OFFICE
MBAI

नियंत्रक शिधावाटप व
संचालक नागरी पुरवठा,
मुंबई.